महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - १

*ई-मेल mahatet2021.msce@gmail.com दूरध्वनी क्रमांक:०२०-२६१२३०६६/६७*


## "महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०२१ (MAHATET - 2021) - जाहीर प्रकटन"

प्राथमिक शिक्षक पदाकरिता फक्त पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेस (MAHATET) प्रविष्ठ होण्याकरिता शैक्षणिक /व्यावसायिक अर्हता प्राप्त परीक्षार्थींकडून अर्ज मागविणेबाबत .

### महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०२१ वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | ०३/०८/२०२१ ते २५/०८/२०२१ वेळ : २३.५९ वाजेपर्यंत |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे. | २५/०९/२०२१ ते १०/१०/२०२१ |
| ३ | शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - I दिनांक व वेळ | १०/१०/२०२१ वेळ : १०.३० ते १३.०० |
| ४ | शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - II दिनांक व वेळ | १०/१०/२०२१ वेळ : १४.०० ते १६.३० |

*: कोवीड -१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक कार्यवाहीस अनुसरुन सदर वेळापत्राकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारांसाठी अद्ययावत माहिती परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

टीप : १) परीक्षा विषयक सर्व माहिती जसे आवेदनपत्र भरणे, परीक्षा शुल्क, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका,मूल्यमापन व निकाल विषयक सविस्तर माहिती व शासननिर्णय परिषदेच्या वेबसाईटवर https://mahatet.in वर उपलब्ध आहे. त्यातील प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज भरावा.

२) अर्ज भरताना परीक्षार्थींनी इ.१० वी, इ. १२ वी, शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता, दिव्यांगत्व , राखीव प्रवर्गाचे असल्यास जात इत्यादी बाबतची माहिती मूळ प्रमाणपत्रावरुनच भरावी. स्कॅन केलेला नवीनतम रंगीत फोटो व स्कॅन केलेली स्वाक्षरी ऑनलाईन आवेदनपत्रात अपलोड करावयाची असल्याने सोबत ठेवावी.

३) सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांशी संपर्क Email, SMS सुविधा यांद्वारे होऊ शकतो. त्यामुळे उमेदवारांनी स्वत:चा ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अचूक द्यावा.

४) पेपर I (प्राथमिकस्तर) व पेपर II (उच्च प्राथमिकस्तर) दोन्ही प्रश्नपत्रिकेसाठी प्रविष्ट होऊ इच्छिणा-या उमेदवारांनी दोन्ही स्तरासाठी (प्राथमिकस्तर/उच्च प्राथमिकस्तर) असा विकल्प निवडावा, जेणेकरुन परीक्षा बैठक व्यवस्था एकाच ठिकाणी करता येईल. प्रत्येक स्तरासाठी स्वतंत्र अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

५) सदर जाहिरातीनुसार उमेदवारांना केवळ Online अर्ज करता येईल.परीक्षेचे शुल्क ऑनलाईन बँकिंग,क्रेडिट/डेबिट कार्ड इ.द्वारे ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.(चलनाद्वारे ऑफलाईन शुल्क भरता येणार नाही.) परीक्षा शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर आवेदनपत्रामध्ये कोणत्याही स्वरुपाची दुरुस्ती करता येणार नाही व त्याबाबतचे निवेदन स्विकारले जाणार नाही.

६) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत परीक्षा शुल्क ऑनलाईन रित्या स्विकारले जाईल. विहित पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय सदर अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७) ऑनलाईन आवेदनपत्रासोबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जोडण्याची आवश्यकता नाही.तसेचआवेदनपत्रे/कागदपत्रे(प्रमाणपत्रे) गट शिक्षणाधिकारी/ शिक्षणाधिकारी यांच्याकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.

८) मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीस अधीन राहून उमेदवारांना परीक्षेस तात्पुरता प्रवेश दिला जाईल, व निकाल घोषित केला जाईल.परीक्षेच्या निकालानंतर शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांची पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या वेळी करणेत येईल. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी कागदपत्रे अपूर्ण असल्यास, अथवा उमेदवार प्रमाणपत्रे सादर करु न शकल्यास या परीक्षेची पात्रता रद्द करण्यात येईल. ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये भरलेल्या माहितीत व मूळ कागदपत्रांमध्ये तफावत आढळून आल्यास पात्रता रद्द करण्यात येईल.

**माहिती स्त्रोत :**

| हेल्प लाईन क्रमांक | दूरध्वनीद्वारे सहाय्य उपलब्धता कालावधी | सविस्तर माहितीकरिता संकेतस्थळ |
|---|---|---|
| ८९५६४७०८९१/९२/९३/९४/९५/९६ | दि.३१/०७/२०२१ ते दि.१०/१०/२०२१ | https://mahatet.in |

स्थळ :- पुणे

दिनांक :- ३१/०७/२०२१

(तुकाराम सुपे)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.